# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक २७.०८.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २६.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ११ केसेसमध्ये ११ ईसमावर कारवाई करून एकुण ५८,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये १३ इसमांवर कारवाई करून एकुण ३,५९,१७५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७५३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ८६,३००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २६.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २७.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०५ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पथकाची कामगीरी :— वाहनचोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २४.०८.२०२६ चे २१.०० वा. ते २१.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी अभिषेक विनायक गेडेकर वय २३ वर्ष रा. प्लॉट क्र. ४४, भरतवाडा, कळमणा, नागपूर यांनी त्यांची हिरो होन्डा स्प्लेंडर गाडी क्र. एम.एच. ४९ बीवाय २४३८ ही पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत मोबाईल एक्सप्रेस दुकानासमोर, टेलिफोन एक्सचेंज चौक येथे लॉक करून, पार्क करून दुकानात गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे लकडगंज येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयांचे समांतर तपासात, गुन्हेशाखा युनिट क्र. ०३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे राहुल शंकरराव सातपुते वय ३९ वर्षे रा. टेलिफोन एक्सचेंज चौक, लकडगंज, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस गुन्हयात अटक करून त्याचे ताब्यातुन गुन्हयात चोरी केलेले वाहन हिरो होंडा स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ४९ बीवाय २४३८ किंमती ८०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर व त्यांचे पथकाने केली.




**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवनः— जिवे ठार मारणारे आरोपी अटकेत.</u>**

दिनांक २५.०८.२०२६ चे २०.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी अश्विन उर्फ सोनु अमित राहांगडाले वय ३२ वर्ष रा. कुंभारटोली, जुना बगडगंज, नागपूर व त्याचा मित्र अक्षय बंडु वंजारी वय २८ वर्ष रा. बजरंग नगर, मनपा शाळेमागे, जुना बगडगंज, नागपूर तसेच इतर मित्र हे पोलीस ठाणे नंदनवन हद्यीत एका बारमध्ये बसलेले होते. अक्षयचे पत्नीचा त्याला फोन आल्याने, तो घरी जात असता, द प्रिझम बिल्डींगसमोर, शास्त्रीनगर, कुंभारटोळी येथे आरोपी १) सुरज विलास लांजेवार वय ३० वर्ष २) वंदना विलास लांजेवार वय ४७ वर्ष दोन्ही रा. शास्त्रीनगर, कुंभारटोळी ३) प्रशांत दिनेश आखरे वय २६ वर्ष रा. प्लॉट क्र. ४३१, गरोबा मैदान, बगडगंज, नागपूर ४) हार्दीक मारोतराव पालांदुरकर वय २४ वर्ष रा. प्लॉट कग. २२०, आंबेडकर नगर लाईन, गरोबा मैदान, नागपूर ५) प्रदीप आखरे वय ४८ वर्ष रा. गरोबा मैदान, नागपूर यांनी संगनमत करुन फिर्यादीचा मित्र अक्षय यांनी पोलीसांना मुखबिरी केल्याने आरोपी क्र. १ चे भावास चोरीचे गुन्हयात अटक झाली अशा संशयावरुन अक्षयचे डोळयात मिरची पावडर टाकून हातबुक्कीने मारहाण केली. अक्षय याने फिर्यादीजवळ परत येऊन सांगितले व दोघेही परत घरी जात असता, आरोपींनी अक्षय यास शस्त्राने मारहाण करुन गंभीर जखमी केले. फिर्यादीने जखमी यास उपचाराकरीता एनएचएस हॉस्पिटल व तेथून एम्स् हॉस्पिटल येथे दाखल केले होते.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे मपोउपनि दीपाली गाठे ७८७५६९३०७१ यांनी आरोपींविरुध्द कलम १०९(३),११५(२),१८९(२),१९०,१९१(२)(३),३५१(३) भान्यासं सहकलम ४,२५ भाहका अन्वये गुन्हा नोंद केला होता. नंदनवन पोलीसांनी गुन्हयाचे तपासात आरोपींचा शोध घेऊन आरोपी क्र. १ ते ४ यांना अटक केली आहे. जखमी यास उपचारादरम्यान डॉक्टरांनी दिनांक २६.०८. २०२६ चे २०.३० वा. तपासुन मृत घोषित केल्याने गुन्हयांमध्ये कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये कलमवाढ केली आहे. इतर आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमणा :— जिवे ठार मारणारा आरोपी भाऊ अटकेत.</u>**

पोलीस ठाणे कळमणा हद्यीत, प्लॉट क्र. २२३, पाच झोपडा, मिनीमाता नगर, गली क्र १६, कळमणा येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. कुमारीबाई चिंताराम बांते वय ५० वर्ष यांचे घरी पती, मोठी मुलगा मोहन वय २१ वर्ष व लहान मुलगा समीर वय १९ वर्ष असे राहतात. मोठा मुलगा हा काही कामधाम करीत नसुन दारु पिण्याचे सवईचा व रोज घरी भांडण करुन आई वडील व भावास शिवीगाळ करतो व मारण्यासाठी अंगावर धावून येतो. दिनांक २६.०८.२०२६ चे सायंकाळी फिर्यादीचा मुलगा मोहन याने दारु पिऊन घरी शिवीगाळी केली व फिर्यादीस दारु पिण्यासाठी पैशांची मागणी केली. फिर्यादीने नकार दिला असता, त्याने घरातील अन्न व सामानाची नासधुस करुन लहान भाऊ समीर यास चाकुने मारण्याची धमकी दिली. या कारणावरुन रात्री २०.३० ते २१.०० वा.चे

दरम्यान, फिर्यादीचा लहान मुलगा समीर याने चाकुने त्याचा मोठा भाऊ मोहन याचेवर वार करुन गंभीर जखमी केले. नातेवाईकांनी जखमी यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल केले होते.

यापक्ररणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि अजय गर्जे ८८३०००१७०२ यांनी आरोपीविरुध्द कलम १०९(१) भान्यासं सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद केला होता. कळमणा पोलीसांनी गुन्हयाचे तपासात आरोपीचा शोध घेऊन आरोपीस अटक केली आहे. जखमी यास उपचारादरम्यान डॉक्टरांनी दिनांक २७.०८.२०२६ चे ०१.१५ वा. तपासुन मृत घोषित केल्याने गुन्हयांमध्ये कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये कलमवाढ केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे गिट्टीखदान :–** दिनांक २६.०८.२०२६ चे १९.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, रामदेवबाबा टेकडी, पाण्याचे टाकीजवळ अनुप नावाचा वय अंदाजे ६० वर्षे वयाचा व पत्ता माहित नसलेला इसम, आजारी अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले. नमुद मृतक हा शिवाजी चौक, अनंत नगर येथील दारु भटटीवर काम करुन आपला उदरनिवार्ह करीत असल्याचे समजले आहे. नमुद इसमाचे नातेवाईकांचा शोध लागलेला नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे संपर्क साधावा.

यापक्ररणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. बालाजी देशमुख यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि खुशाल राठोड यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी नागपुर. | ३००१८८/ २०१३ | कलम २७९, ३०४ अ भा.दं.वि. | निलेश संपतराव खांडगे रा. फ्लॅट क्र. ४, जयका अपार्टमेंट, हेरीटेजचे बाजुला, सिव्हील लाईन, नागपुर | २८.०९.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**